# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३८–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. शामू कृष्णा बेरड (पाटील),<br>मु. पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शामू कृष्णा बेरड (पाटील), मु. पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी गट क्र. १०५१ मध्ये ५ अश्वशक्ती नवीन वीज पुरवठा मिळावा यासाठी दि. २३.४.२०१० रोजी वि.प.कडे अर्ज केला व त्यासाठी भरावी लागणारी फी मनीऑर्डरने पाठविली आहे, परंतु आजतागायत चलन मिळाले नाही. तक्रारदाराने वि.प.कडे चौंकशी केली असतां, थकबाकी आहे ती भरा व मगच वीज पुरवठा मिळेल असे तोंडी सांगितले. थकबाकी असेल तर ती पूर्वीच वि.प.ने का नाही वसूल केली ? तक्रारदाराने दि. २७.४.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. २८.४.२०१० रोजी आदेश पारित केले. त्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतचे अपील मंचासमोर दि. २९.६.२०१० रोजी दाखल केले. मंचाकडून अपेक्षा तक्रारदारास चलन मिळावे व झालेल्या विलंबापोटी कृती मानकातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १९.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांचा शेतीपंप वीज पुरवठ्याचा अर्ज दि. २६.४.२०१० रोजी मिळाल्याचे मान्य केले व त्यांस दि. ९.७.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २८.७.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग श्री. भोसले, कनिष्ठ अभियंता श्री. राठोड उपस्थित. श्री. खापरे यांनी असे प्रतिपादन केले की, दि. २२.५.२०१० रोजी चलन देणे जरुरी होते ते दि. ९.७.२०१० ला देण्यात आले आहे, त्यामुळे वि.प.कडून विलंबापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली. विलंबाबाबत वि.प.तर्फे कुठलाही लेखी/ तोंडी खुलासा करण्यात आला नाही.

विलंब झाला आहे हे स्पष्ट होते, कारण कृती मानके विनिमयातील तरतुदीनुसार दि. २२.५.२०१० पर्यंत चलन देणे जरुरी होते. चलन दिले नाही म्हणून तक्रार दाखल करावी लागली. थोडक्यात, कृती मानकातील तरतुदीची अंमलबजावणी सुखर व्हावी यासाठी तक्रारदार यांस अंतर्गत तक्रार निवारण कक्ष किंवा या मंचाकडे धाव घ्यावी लागली. त्यामुळे वि.प.च्या अधिकाऱ्यांना एस.ओ.पी.ची अंमलबजावणी सन २००५ लागू झाली याची माहिती नाही असे दिसते. चलन दि. ९.७.२०१० रोजी देण्यात आले त्याबाबत कांही वाद नाही. त्यामुळे तक्रारदारास दि. २२.५.२०१० ते ९.७.२०१० या ७ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ७००/– कृती मानके परिशिष्ट अ नुसार वि.प.ने भरपाई द्यावेत. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) दि २२.५.२०१० ते ९.७.२०१० या कालावधीतील विलंबाच्या ७ आठवड्यासाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ७००/– भरपाई वि.प.ने तक्रारदारास द्यावी.

३) सदर रकमेचे २ बिलींग सायकलमध्ये समायोजन करण्यात यावे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी

( बी. जी. पवार )
अध्यक्ष